मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेची डेंगी प्रतिबंधक यंत्रणा अलर्टमोडवर

## शहरात डेंगी बीट मोहिमेअंतर्गत सर्वेक्षण करून नागरिकांमध्ये जनजागृती





**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाल्याने महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरातील प्रत्येक घरे, विविध आस्थापना, बांधकाम साईट, भंगार दुकाने यासह विविध ठिकाणी डासांच्या आळ्याची तपासणी करण्यात येत आहे. डेंगी, चिकुनगुनिया आणि मलेरियासारखे आजार रोखण्यासाठी डास उत्पत्तीची ठिकाणे नष्ट करुन नागरिकांमध्ये जनजागृती सुरु आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात पावसाळ्यात वाढणाऱ्या सार्थीच्या आजारांना आळा घालण्यासाठी महापालिकेकडून उपाययोजना सुरु आहेत. डेंगी बीट मोहिमेतून सर्वेक्षण करत नागरिकांमध्ये जनजागृती सुरु आहे.

पावसाळ्यात हिवताप, डेंगी, चिकुनगुनिया सारखे रोग पसरू नयेत म्हणून महापालिकेकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. शहरातील डेंगी, मलेरिया प्रतिबंधक मोहिमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शहरात डेंगीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तपासणी पथकातील कर्मचारी तपासणीसाठी आल्यास त्यांना नागरिकांनी सहकार्य करावे.

तसेच महापालिकेच्या रुग्णालयांत तसेच दवाखान्यांमध्ये डेंगीच्या तपासणी करिता आवश्यक असलेले रॅपिड किट उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. किटकजन्य रोग नियंत्रणासाठी स्वच्छ पाण्यात गप्पी मासे सोडणे, शहरातील विविध ठिकाणी पाहणी करून घरांच्या कंटेनरचे सर्वेक्षण, व्यवसायाच्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यासाठी तपासणी पथकांची नेमणूक करून डासांच्या आळ्या आढळून आलेल्या ठिकाणी कारवाई करण्यात येत आहे.

ज्या भागात डेंगीचे रुग्ण जास्त आढळतात, त्या ठिकाणी धूर फवारणी करण्यात येणार आहे. कंटेनर सर्व्हेअंतर्गत डासांची उत्पत्ती स्थानके शोधून नष्ट करण्यात येणार आहे. जून महिन्याच्या सुरूवातीलाच शहरामध्ये डेंगीचे २० संशयित रुग्ण आढळले आहेत. तसेच तीव्र थंडी ताप असलेल्या रुग्णांची संख्या दहा दिवसांमध्ये सहा हजार ८९० रुग्ण आढळले आहेत.

या शिवाय चिकनगुनियाचे चार संशयित रुग्ण आढळले आहेत. पावसाचे पाणी साचून त्यामध्ये डासांची उत्पत्ती होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसांमध्ये साथीच्या आजारांमध्ये वाढ होते.


डेंगी, मलेरिया व चिकनगुनिया हे आजार पावसाळ्याच्या दिवसांमध्ये जास्त वाढतात. महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने गेल्यावर्षी शहरामध्ये ज्या भागात जास्त डेंगीचे रुग्ण आढळले होते. त्या भागात उपाययोजना करुन जनजागृती करण्यात येत आहे.

### ही काळजी घ्या

- पावसाळ्यात परिसर स्वच्छ ठेवा
- आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळा
- घरातील सर्व भांडी रिकामी करून ठेवा
- परिसरात साचलेल्या पाण्याचा निचरा करा
- घरामध्ये कुंड्या, छतावरील भंगार साहित्यामध्ये पाणी साचू देऊ नये
- थंडी ताप अशी लक्षणे आढळल्यास नजीकच्या दवाखान्यात तपासणी करून घ्या

# डॉ. आंबेडकर स्मारकामागील पोलीस स्टेशनचे आरक्षण तत्काळ रद्द करा

## ..अन्यथा तीव्र जनआंदोलन : माजी स्थायी समिती अध्यक्षा सिमा सावळे यांचा प्रशासनाला इशारा



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या हृदयस्थानी असलेल्या आणि समस्त आंबेडकर अनुयायांसाठी श्रध्देचे केंद्रबिंदू ठरलेल्या महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यामागील 'भीमसृष्टी मैदान' आता धोक्यात आलं आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या सुधारित विकास आराखड्यात या मैदानावर चक्क पोलीस स्टेशन, मनपा उपयोग आणि बस टर्मिनसचे आरक्षण टाकले आहे. याठिकाणी आरक्षण टाकून प्रशासनाने शहरातील आंबेडकर अनुयायांच्या भावनांवर क्रूर हल्ला केला आहे. माजी स्थायी समिती अध्यक्षा सिमा सावळे यांनी हा धक्कादायक प्रकार उघडकीस आणत मनपाच्या या अन्यायकारक कृतीवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा उत्सव म्हणजे केवळ एक सोहळा नाही, तर तो विचार, प्रेरणा आणि एकजुटीचा महामेळावा आहे. संपूर्ण शहरातून काढण्यात येणाऱ्या मिरवणुका याच भीमसृष्टी मैदानावर एकत्र येतात, जिथे ज्ञानाचा प्रकाश देणारी प्रबोधनात्मक व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी आठवडाभर परिसर भारलेला असतो. हजारो नागरिक, बालकांपासून वृद्धांपर्यंत, मोठ्या उत्साहात यात सहभागी होतात. इतर वेळा वर्षभरात याच मैदानावर अनेक सामाजिक, राजकीय सभा आणि सांस्कृतिक कार्यक्रम होतात, जिथे अनेक दिग्गजांनी आपले विचार मांडले आहेत. हे मैदान म्हणजे आंबेडकरी चळवळीची आणि पिंपरी-चिंचवडच्या सामाजिक एकोप्याची जिवंत साक्ष आहे. "डॉ. आंबेडकर अनुयायांना या महामानवाला अभिवादन करण्यासाठी शहरात एकच जागा उपलब्ध होती. सुधारित विकास आराखड्याच्या माध्यमातून ती देखील हिसकावण्याचा हा षडयंत्रपूर्वक डाव आखण्यात आला आहे. विशेषतः या ऐतिहासिक जागेवर मुद्दाम पोलीस स्टेशनचे आरक्षण लादून सर्व आंबेडकरी जनतेचा घोर अपमान करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यासाठी जागाच मिळू नये, असा हा नीच कट आहे, असे सिमा सावळे यांनी अत्यंत तीव्र शब्दांत आपला संताप व्यक्त करत म्हटले आहे."

प्रशासनाने तत्काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यामागील भीमसृष्टी मैदानावर टाकलेली सर्व आरक्षणे रद्द करावीत आणि याठिकाणी 'भीमसृष्टी मैदान' हे आरक्षण प्रस्तावित करावे, अशी मागणी सिमा सावळे यांनी केली आहे. अन्यथा, या अन्यायाविरुद्ध मोठे जनआंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. आंबेडकरी जनता आपला स्वाभिमान आणि आपल्या महामानवाच्या स्मृती जतन करण्यासाठी कोणत्याही स्तरावर जाण्यास तयार आहे, असा निर्धार सावळे यांनी व्यक्त केला आहे.

# पुण्यात 4.90 लाख वारकरी दाखल

## वारकऱ्यांचा हरिनाम गजर आणि एआयच्या मदतीने यशस्वी गर्दी नियोजन




**पुणे | प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे पुण्यात आगमन झाल्यानंतर संपूर्ण शहर हरिनामाच्या गजरात न्हाहून गेलं. एकूण चार लाख नव्वद हजार (४.९० लाख) वारकरी पुण्यात दाखल झाले असून, त्यांच्या स्वागतासाठी आणि सुरक्षिततेसाठी यंदा पुणेपोलिसांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत एक अभिनव पाऊल उचलले.

**एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर**

गर्दीचे व्यवस्थापन आणि संख्येचे विश्लेषण करण्यासाठी यासाठी प्रथमच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) प्रणालीचा वापर करण्यात आला. पुणे पोलिसांनी शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी कॅमेरे आणि विशेष सॉफ्टवेअर बसवले होते. या प्रणालीद्वारे दोन्ही पालख्या शहरात दाखल होण्यापासून ते प्रस्थान होईपर्यंतची प्रत्येक हालचाल टिपली गेली.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, "वारीचा प्रचंड जनसागर लक्षात घेता, पारंपरिक उपाय पुरेसे ठरणार नव्हते. त्यामुळे एआयचा वापर करून आम्ही वेळेआधी नियोजन, प्रत्यक्षात अंमलबजावणी आणि नंतर विश्लेषण या तीन पातळ्यांवर यशस्वी कामगिरी केली."

**गर्दीचे उत्तम नियोजन आणि वाहतूक सुरळीत**

एआय प्रणालीद्वारे जमलेल्या आकडेवारीमुळे वाहतूक नियोजन, आपत्कालीन सेवा व्यवस्थापन आणि पोलिस बंदोबस्त अधिक परिणामकारकरित्या राबवता आला. विशेषतः पालखी मार्गावरील प्रमुख रस्ते, चौक आणि वाहनतळ याठिकाणी गर्दीचा अंदाज घेऊन नियोजन करण्यात आले.

### वारीतील गर्दीचे अचूक आकडे

- २० जून: संत तुकाराम महाराज पालखी पुण्यात दाखल – १.९५ लाख वारकरी, ६०० वाहने
- २० जून: संत ज्ञानेश्वर महाराज पालखी दाखल – २.९५ लाख वारकरी, २,००० वाहने
- २० व २१ जून: एकत्रित १.५ लाख वारकरी पुढे प्रस्थान
- २२ जून: दोन्ही पालख्यांचे पुण्यातून प्रस्थान – २.८ लाख वारकरी, १,८०० वाहने

### पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

वारीच्या काळात कोणताही मोठा अनुचित प्रकार घडला नाही, ही यशस्वी कार्यवाही पुणे पोलिसांच्या कणखर नियोजनाची आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराची साक्ष आहे. वारकऱ्यांनीही शिस्तीने सहभागी होत वारीच्या पारंपरिक भक्तिसंस्कृतीला आधुनिक व्यवस्थापनाची जोड दिली. पुण्यातील ही "डिजिटल वारी" भाविकांच्या श्रद्धेप्रमाणेच स्मार्ट यंत्रणेमुळेही संस्मरणीय ठरली.

---

# पीएमपीच्या उत्पन्नात वाढ; मात्र प्रवाशांत घट

## भाडेवाढ केल्यापासून दोन आठवड्यांत सरासरी 15 हजारांहून अधिक प्रवासी घटले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) प्रवासी भाडेवाढ केल्यामुळे दोन आठवड्यांत ‘पीएमपी’चे उत्पन्न वाढले असले, तरी सरासरीच्या तुलनेत प्रवासी संख्येत घट झाली असल्याचे समोर आले आहे. भाडेवाढ केल्यापासून दोन आठवड्यांत सरासरी १५ हजारांहून अधिक प्रवासी घटले आहेत.मे महिन्यात पीएमपीची प्रवासी संख्या सरासरी दहा लाख १४ हजार ७९३ असून, दिवसभराचे सरासरी उत्पन्न एक कोटी ४२ लाख २९ हजार ६६४ रुपये होते.

एक जूनपासून भाडेवाढ केल्यानंतर १५ जूनपर्यंत पीएमपीची प्रवासी संख्या सरासरी नऊ लाख ९९ हजार ८३० पर्यंत आली. दोन आठवड्यांत सरासरी दोन कोटी ११ लाख ८५ हजार ६४ रुपये उत्पन्न मिळाले असल्याची माहिती पीएमपी प्रशासनाकडून देण्यात आली.

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (पीएमआरडीए) उपनगरांच्या हद्दीतील विविध ३९२ मार्गांवरून धावणाऱ्या ‘पीएमपी’ची एक जूनपासून प्रवासी भाडेवाढ करण्यात आली. ही भाडेवाढ पाच टप्प्यांत करण्यात आली.

पीएमपी प्रवासी मंचाचे संजय शितोळे म्हणाले, “पीएमपी प्रशासनाकडे अचूक प्रवासी संख्या मोजण्याचे साधन नाही. पीएमपी प्रशासनाने भाडेवाढ करण्यापूर्वी सेवा नियोजन करणे आवश्यक होते. मात्र, ते झाल्याचे दिसत नाही. अनेक ठिकाणी पाच किलोमीटर अंतराच्या आतील प्रवासासाठीही वीस रुपये भाडे आकारले जात आहे. पीएमपी प्रशासनाकडे तक्रारी केल्यानंतरही कुठलीच कार्यवाही करण्यात आलेली नाही.’



### पीएमपीचे प्रति दिवस सरासरी उत्पन्न आणि प्रवासी

- महिना – सरासरी उत्पन्न – सरासरी प्रवासी
- मे – १,४२,२९,६६४ – १०,१४,७९३
- १५ जूनपर्यंत – २,११,८५,०६४ – ९,९९,८३०

“ ‘पीएमपी’ प्रशासनात भाडेवाढ केल्यानंतर प्रवाशांना सुलभ सेवा देण्यासाठी वेगवेगळ्या पातळीवर कार्यवाही करण्यात येत आहे. महिला प्रवाशांसाठी अनेक मार्गावर विशेष बस सेवा, सुरक्षिततेसाठी पोलिसांची मदत आणि इतर उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पीएमपीची प्रवासी संख्या कायम आहे. बस कमी पडत असल्याने काहीसा परिणाम जाणवतो आहे. मात्र, ताफ्यात नवीन बस दाखल होताच प्रवासी संख्या वाढेल.

- सतीश गव्हाणे, मुख्य व्यवस्थापक, संचालन विभाग, पीएमपीएमएल.

# मेट्रोला वाढता प्रतिसाद; दररोज 80 हजारांपेक्षा अधिक जणांचा प्रवास

## पिंपरी ते स्वारगेट मार्गावर दररोज तब्बल 80 हजारांपेक्षा अधिक प्रवासी मेट्रोने जलद व सुरक्षितपणे ये-जा करीत आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी, संत तुकाराम नगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी आणि दापोडी हे सहा मेट्रो स्टेशन आहेत. या मार्गावरून पुण्यातील स्वारगेट तसेच, वनाज आणि रामवाडीपर्यंत मेट्रो मार्गावरून इच्छितस्थळी सहज ये-जा करता येते.

जोरदार पाऊस, खड्डेमय रस्ते व चिखल, नेहमीच होणारी वाहतूक कोंडी, प्रदूषणात वाढ, भरमसाट सिग्नलमुळे अडथळ्याची शर्यत, पीएमपी बसची अपुरी संख्या आदी कारणांमुळे नागरिक वैतागले आहेत. त्यामुळे स्वतःचे वाहन वापरण्यापेक्षा तसेच, बसने प्रवास करण्यापेक्षा मेट्रोचा पर्याय निवडला जात आहे.

पुण्यातील बहुतांश प्रमुख ठिकाणी मेट्रोने सहज जाता येत असल्याने, फेऱ्यांची संख्या मोठी असल्याने तसेच, तिकीटही जास्त नसल्याने मेट्रोला नागरिकांची पसंती वाढत आहे. विद्यार्थी, कामगार, नोकरदार, व्यावसायिक, अधिकारी, महिला आणि नागरिक मेट्रोला पसंती देत आहेत.




### दीड वर्षात निगडीहून करता येणार प्रवास

» पिंपरी ते निगडी या 4.5 किलोमीटर अंतराच्या विस्तारीत मेट्रो मार्गाचे काम वेगात सुरू आहे. ते काम दीड वर्षात पूर्ण होऊन तो वाहतुकीस खुला करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर निगडीच्या भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापासून नागरिकांना मेट्रोने प्रवास करता येणार आहे. तसेच, टिळक चौक, आकुर्डी, चिंचवड स्टेशन येथूनही मेट्रोने ये-जा करता येईल. त्यामुळे शहरातील अनेक भाग मेट्रोशी जोडले जाणार आहेत. परिणामी, प्रवासी संख्या दुप्पटीपेक्षा अधिकने वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पिंपरी ते स्वारगेट अशी थेट मेट्रो प्रवासीसेवा वाहतूक 29 सप्टेंबर 2024 ला सुरू झाली आहे. त्या महिन्यात दररोज 40 हजार इतकी प्रवासी संख्या होती. त्यानंतर 50 हजार, 60 हजार अशी प्रवासी संख्या वाढत गेली आहे. सध्या त्यात दुपटीने वाढ झाली आहे.

अनेक नागरिक मेट्रोकडे वळले आहेत. प्रवासांची वाढती संख्या लक्षात घेऊन 7 मिनिटाऐवजी आता 6 मिनिटांनंतर मेट्रोची फेरी सुरू केली आहे. त्यामुळे मेट्रो लगेच उपलब्ध होते. तसेच, अतिरिक्त मनुष्यबळही वाढविले आहे. विस्तारीत मेट्रो मार्गाचे काम वेगात सुरू आहे. ते काम दीड वर्षात पूर्ण होऊन तो वाहतुकीस खुला करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर निगडीच्या भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापासून नागरिकांना मेट्रोने प्रवास करता येणार आहे. तसेच, टिळक चौक, आकुर्डी, चिंचवड स्टेशन येथूनही मेट्रोने ये-जा करता येईल. त्यामुळे शहरातील अनेक भाग मेट्रोशी जोडले जाणार आहेत. परिणामी, प्रवासी संख्या दुप्पटीपेक्षा अधिकने वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### प्रत्येक सहा मिनिटास मेट्रो उपलब्ध

» रस्त्यावरून वाहतूक करण्यास मर्यादा येतात. खासगी वाहन वापरल्याने अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अनेक नागरिक मेट्रोकडे वळले आहेत. प्रवासांची वाढती संख्या लक्षात घेऊन 7 मिनिटाऐवजी आता 6 मिनिटांनंतर मेट्रोची फेरी सुरू केली आहे. त्यामुळे मेट्रो लगेच उपलब्ध होते. तसेच, अतिरिक्त मनुष्यबळही वाढविले आहे. रात्री अकरापर्यंत मेट्रोने प्रवास करता येतो, असे महामेट्रोचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत सोनवणेयांनी सांगितले.

### शनिवारी, रविवारी तिकीट दर कमी

» प्रवाशांना शनिवारी व रविवारी तिकीट दर निम्मे असते. कमी खर्चात प्रवास करता येत असल्याने त्या दिवशी नागरिकांचा प्रतिसाद आणखी वाढतो. प्रवासी संख्येच्या आकडेवारीनुसार या दोन दिवसांत प्रवासी संख्या नेहमीच्या तुलनेत अधिक असल्याचे दिसून येत आहे. शनिवारी व रविवारी नागरिकांची संख्या 82 हजारांच्या पुढे पोहचत आहे.

# ओढे-नाल्यांचा प्रवाह रोखल्यामुळेच हिंजवडीत पूरस्थिती....

## संबंधितांवर पीएमआरडीए, एमआयडीसीसह इतर यंत्रणांकडून होणार कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी फेज - १, २ आणि ३ तसेच मेट्रो मार्गासह परिसरात नियमांचा भंग करून ओढे - नाल्यांचा नैसर्गिक पाण्याचा प्रवाह रोखल्यामुळेच पूर परिस्थिती निर्माण होत आहे. पीएमआरडीएसह एमआयडीसी हद्दीतील १३ ठिकाणी नैसर्गिक पाण्याचा प्रवाह परस्पर बदल तसेच रोखणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उभारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या संदर्भात पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी नुकतीच लोकप्रतिनिधींसह प्रशासकीय यंत्रणांची संयुक्त बैठक घेत संबंधितावर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासह एमआयडीसी हद्दीतील ओढे - नाल्यांचा नैसर्गिक पाण्याचा प्रवाह काही कंपन्या, बिल्डर आणि नागरिकांनी परस्पर रोखला तसेच स्थलांतरित केला आहे. काही ठिकाणी मनमर्जीप्रमाणे बांधकामे करण्यात आल्याचे पुढे येत असून संबंधित बांधकामे थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहे. यासह प्रशासनाला सहकार्य न करणाऱ्या तसेच नियमबाह्य पद्धतीने बांधकामे करणाऱ्यांवर थेट गुन्हे नोंदवण्याची प्रक्रिया आगामी काही दिवसात करण्यात येणार आहे.

हिंजवडीसह परिसरात पावसाचे पाणी साचत असल्याने पाण्याचा निचरा रस्ते दुरुस्तीसह नागरी सोयी सुविधांच्या अनुषंगाने बहुतांश कामे प्रशासकीय यंत्रणेमार्फत करण्यात आली आहे. हिंजवडी आयटी पार्क क्षेत्रातील रस्ते दुरुस्तीसह मेट्रो मार्गिकेलगतचा राडारोडा हटवणे, गटार व नालेसफाई, खड्डे बुजवणे, अनधिकृत स्टॉल हटवणे यासह इतर आवश्यक ती कामे पूर्ण झाल्याने नागरी समस्या निश्चितच सुटणार आहे. यासह पीएमआरडीए आणि एमआयडीसी हद्दीतील नैसर्गिक ओढे - नाल्यांतील पाण्याचा प्रवाह परस्पर रोखला तसेच स्थलांतरित करण्यात आला, अशी १३ ठिकाणे शोधण्यात आली आहे. त्यामुळे संबंधितांनी नैसर्गिक पाण्याचा प्रवाह खुला करावा, अन्यथा त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.



### या भागात रोखण्यात आला ओढ्या नाल्यांचा प्रवाह

- » ग्लोबल सेझ टेक पार्कजवळ, भोईरवाड
- » टाटा कन्सल्टन्सीजवळ, भोईरवाडी
- » मेट्रो पोलिस मेट्रो स्टेशनजवळ, मान
- » माण देवी मंदिर -१ मान
- » माण देवी मंदिर, ग्रामपंचायत
- » स्मशान भूमी, मान
- » टेक महिंद्रा आयटी पार्कजवळ, मान
- » क्वाड्रॉन मेट्रो स्टेशन वन विभागाच्या जागेलगत, मान
- » गट नं. २८६ जवळ, मान
- » गट नं. २८ जवळ, मान
- » गट नं. २८१ जवळ, मान
- » गट नं. २७९ ,२७१, २७२, २७३ जवळ, मान

# माळेगावच्या मतदानासाठी उच्चांकी चुरस

## ९० उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद : चौरंगी लढतीत चुरस

**पुणे | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत ब गटातून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राज्याचे लक्ष वेधले. चौरंगी लढतीत २१ जागांसाठी रविवार (दि.२२) चुरशीने मतदान झाले. ३७ गावांतील ६७ मतदान केंद्रांवर मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सहा गटांत ८८. ४८ टक्के मतदान झाले. ब वर्गात ९९.०२ टक्के मतदान झाले आहे. ९० उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे.

माळेगाव कारखान्यात अ गटात १९ हजार ५४९ मतदार आहेत. तर ब गटात १०२ मतदार आहेत. त्यापैकी अ गटात १७ हजार २९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला तर ब गटात १०१ मतदारांनी हक्क बजावला. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीची मतदान प्रक्रिया सकाळपासून शांततेत व सुरळीत पार पडली. ३७ गावांतील ६७ मतदान केंद्रावर मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सहा गटांत टक्के ८८. ४८ टक्के मतदान झाले. मतदानादिवशी कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. यावेळी बारामती, माळेगाव पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात केला होता.

माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे श्री नीलकंठेश्वर पॅनेल, चंद्रराव तावरे व रंजन तावरे या गुरू-शिष्यांचा सहकार बचाव शेतकरी पॅनल, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा बळीराजा सहकार बचाव पॅनल आणि कष्टकरी शेतकरी समितीचा पॅनल व इतर अपक्ष, महत्त्वाचे म्हणजे, 'ब' वर्ग गटातून स्वतः उपमुख्यमंत्री अजित पवार यांची उमेदवारी आहे. ९० उमेदवारांचे भवितव्य आज मतपेटीत बंद झाले. माळेगाव ,पणदरे, सांगवी, खांडज, नीरा वागज, बारामती या सहा गटांत उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते सकाळपासून मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्यासाठी नियोजन करीत होते.




### क्रॉस व्होटिंगचा फटका कोणाला?

» माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत क्रॉस व्होटिंगची चर्चा दिवसभर राहिली. पॅनल टू पॅनल मतदान करण्याचे आवाहन सर्व पॅनलच्या वतीने करण्यात आले होते. मात्र, निवडणुकीत गावकी, भावकी व जात फॅक्टर चालल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे क्रॉस व्होटिंग मोठ्या प्रमाणात झाले असावे असा तर्क राजकीय वर्तुळात लावला जात होता. मराठा व धनगर समाजाचे प्राबल्य कार्यक्षेत्रात आहे. त्यामुळे क्रॉस व्होटिंगचा फटका नेमका कोणाला बसणार याकडे लक्ष लागले आहे.

### महिलांनी हक्क बजावला

» माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत ८८.४८ टक्के मतदानाची नोंद झाली. ब वर्गात ९९.२ टक्के मताची नोंद झाली. एकूण १९ हजार ५४९ मतदार असून १७ हजार २९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. १४ हजार ५८८ पैकी १२ हजार ८६२ पुरुष व ४ हजार ९५१ पैकी ४ हजार ४३४ महिलांनी मतदानाचा हक्क बजावला. यात महिलांची मतांची टक्केवारी जादा होती. ब वर्गात एकूण १०२ मतदार आहेत. १०१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पुरुष ९९ तर दोन स्त्रियांनी मतदान केले.

“ बारामती शहरातील प्रशासकीय भवन येथे (दि.२४) मतमोजणी होणार असून मतमोजणीची सर्व प्रशासकीय तयारी अंतिम टप्प्यात आली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत माने यांनी सांगितले. ६७ मतदान केंद्र असून एकूण ३४ टेबलवर मतमोजणी होणार आहे. प्रत्येक टेबलला चार कर्मचारी असणार आहेत. चार पक्ष व अपक्ष असे ९० उमेदवार रिंगणात आहेत. मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर मत पेट्या स्ट्रॉंग रूममध्ये असतील. सीसीटीव्ही कॅमेरेची नजर सर्वत्र असेल. सीसीटीव्ही फुटेज बाहेरच्या बाजूला उपलब्ध करून दिले आहे. उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी देखील मतपेटींवर लक्ष ठेवू शकतात.

**- यशवंत माने, निवडणूक निर्णय अधिकारी, बारामती.**

# वाघोली-केसनंद रोडवर खड्ड्यांमुळे अपघातांच्या संख्येत वाढ

## अनेक वर्षांपासून रखडलेल्या समस्येवर प्रशासन ठोस उपाययोजना कधी करणार, असा सवाल नागरिक करीत आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळ्यात चेंबरमधून बाहेर येणारे पाणी, पावसाचे पाणी वाघोली-केसनंद रोडवर सातत्याने वाहत असल्याने वाहनांची वाढलेली वर्दळ व पाण्यामुळे याठिकाणी प्रचंड खड्डे पडले असून खड्ड्यांमुळे अपघातांच्या संख्येत वाढ होत चालली आहे. तात्पुरते खड्डे बुजविण्यात आले तरी पुन्हा खड्डे पडत असल्याने दररोज अनेक अपघात येथील रहिवाशांना पहावयास मिळत आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या समस्येवर प्रशासन ठोस उपाययोजना कधी करणार, असा सवाल नागरिक करीत आहेत.

वाघोलीत पडत असलेल्या पावासामुळे रस्त्यांवर पाणीच पाणी साचत असल्याने बहुतांश रस्त्यांवर खड्डे पडल्याचे दिसत असतानाच दरवर्षी केसनंद रोडवरील या खड्ड्यांच्या समस्येला पावसाळ्यात दररोज सामोरे जात आहे. चेंबर मधून ओव्हरफ्लो होऊन वाहणारे ड्रेनेजचे पाणी, पाण्यामुळे पडणारे खड्डे, खड्ड्यांमुळे होणारे अपघात, वाहनांच्या लांबच लांब लागलेल्या रांगा, खड्ड्यांवर तात्पुरती केली जाणारी मलमपट्टी केसनंद रोडवर वास्तव्यास असणारे नागरिक तसेच वाहनचालकांना सवयीचे झाले आहे.

केसनंद रोडवर काही रस्ता काँक्रीटीकरणाचा तर काही रस्ता डांबरी आहे. डांबरी रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. डांबरी रस्ता काँक्रिट करणे गरजेचे होते. मात्र, याकडे दुर्लक्ष करून दरवर्षी डांबरीकरण करून भागविले जाते. पाऊस सुरु झाला की डांबरी रस्त्याची दुरवस्था होते. हा खेळ अनेक वर्षापासून सुरू आहे. वाहणारे सांडपाणीही महापालिका बंद करू शकलेली नाही.



नागरिकांना मात्र मुकाट्याने सहन

पुणे नगर रोडच्या पावसाळी वाहिनीला अनेक सोसायट्यांनी सांडपाणी वाहिनी जोडल्याने ते पाणी ओव्हरफ्लो होऊन केसनंद रस्त्यावर येत आहे. याबाबत बैठका झाल्या की सोसायट्यांवर कारवाईचे आश्वासन अधिकाऱ्यांकडून मिळते. प्रत्यक्षात कारवाई होत नाही. नागरिक लोकप्रतिनिधी, पालिका अधिकाऱ्यांकडे सातत्याने संताप व्यक्त करीत असतात. मात्र, यावर ठोस उपाययोजनाच केली जात नसल्याने करण्यापलीकडे पर्याय नाही.

### केसनंद रोडला पाणी हमखास

» केसनंद रोडवर मात्र, पाऊस गेला तरी पुढील काही दिवस पाणी वाहत असते. काळे ओढा परिसरामध्ये केसनंद फाटा ते काळे ओढ्यापर्यंत येणारे पाऊस आणि ड्रेनेजचे पाणी, आयुर्वेदिक कॉलेज ते काळे ओढा येणारे पावसाचे पाणी, आयव्ही इस्टेट परिसरातून मोकळे सोडलेले पावसाचे पाणी काळे ओढा परिसरामध्ये वाहून येते आहे. पाण्याच्या सततच्या वाहण्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली आहे.

“ सार्वजनिक बांधकाम विभाग व पुणे मनपाच्या वतीने वारंवार खड्डे बुजवण्यात येत आहे. मात्र, पावसाच्या पाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने खड्डे वाढत आहे. कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

**- रामभाऊ दाभाडे, माजी जिल्हा परिषद सदस्य.**